१५५

राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या
<u>६ जिल्हयांसाठी विशेष पॅकेज-तातडीची मदत.</u>

...ल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७
दिनांक :-२३ जानेवारी, २००६
पहा:- शासन निर्णय,महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक १९.१२.२००५,

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या प्रकरणी ६ जिल्हयांसाठी विशेष पॅकेजमध्ये शेतक-यांच्या विकासासाठी व कल्याणासाठी विविध उपाययोजना अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. या पॅकेजमधील काही तरतूदी शासन निर्णयातील त्या त्या परिच्छेदामध्ये नमूद केल्यानुसार राज्यातील इतर जिल्हयांनाही लागू आहेत. शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र.२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे पॅकेजमधील मुद्देनिहाय सविस्तर आदेश संबंधित विभागांनी निर्गमित करावयाचे आहेत.

आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटूंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून निश्चित केलेल्या निकषानुसार मदत देण्यात येत होती. आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, सदर मदत नियमित अर्थसंकल्पातून देण्यात यावी व त्यासाठी "सामाजिक सुरक्षा व कल्याण" या लेखाशिर्षाखाली आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी. पात्र शेतक-यांच्या कुटूंबियांना सदर मदत तातडीने मिळावी या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

(१) जेव्हा शेतक-याच्या आत्महत्येचे प्रकरण निदर्शणास येईल तेव्हा संबंधित जबाबदार पोलीस अधिका-यामार्फत त्याचा प्राथमिक तपास तातडीने करण्यात यावा.

(२) वरीलप्रमाणे तपास केल्यानंतर शेतक-याच्या आत्महत्येप्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी संबंधित तहसिलदार, पोलीस अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्या पथकाने जागेवर प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करावी व या पथकाने आपला अहवाल जिल्हाधिकारी यांना

...कार्यालय, रत्नागिरी
९३
0 JAN 2006
दि.न. -
जिल्हाधिकारी
4030

घटना घडल्यापासून ८ दिवसाचे आत सादर करावा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने त्या आधारे मदत देण्याबाबत निर्णय घ्यावा.

(३) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात येणा-या समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, जिल्हा कृषी अधिक्षक, शेतक-यांचा एक प्रतिनिधी व सामाजिक संस्थेचा एक प्रतिनिधी यांचा सहभाग असावा. समितीने आत्महत्येची घटना घडल्यापासून १५ दिवसांचे आत मदत देण्याबाबत निर्णय घ्यावा.

(४) शासनाने शेतक-यांच्या आत्महत्ये प्रकरणी मदत देण्याबाबतचे निकष निश्चित केलेले आहेत ते या पुढेही लागू राहतील. म्हणजे नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करु न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्जपरतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या घडली असल्यास, संबंधित शेतक-यांच्या वारसांना रुपये १ लाख इतकी मदत देय राहील. ही मदत रु. ३०,००० धनादेशाद्वारे व ७०,००० पोस्ट / बँकेच्या मासिक प्राप्ती योजनेमध्ये मृत शेतक-याच्या वारसाच्या नांवे जमा करावेत.

(५) या मदतीसाठी "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण" या लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. निधीच्या उपलब्धतेबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी वरीलप्रमाणे शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रत्येक प्रकरणी कार्यवाही करावी, व केलेल्या कार्यवाहीबाबत वेळोवेळी शासनास अहवाल सादर करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

के. एस. वत्स

(के. एस. वत्स)
संचिव(मदत व पुनर्वसन.)
महसूल व वन विभाग.